# डॉ. बाबासाहेब आंबेडकर
# यांनी
# स्थापित केलेल्या संघटनांचे

# संविधान

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया

समता सैनिक दल

दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांनी स्थापित केलेल्या
संघटनांचे

# संविधान

पाचवी आवृत्ति
दिनांक : ३० सप्टेंबर २०१७
(धम्मचक्र प्रवर्तन दिन)

प्रकाशक :
समता सैनिक दल
HQ. : दिक्षाभुमी, नागपुर
संपर्क :
नागपुर – 9823050476, 9860019717
चंद्रपुर – 8999685785
मुंबई – 9673790315
पुणे – 9158895147

E-mail : support@ssdindia.org
Website : www.ssdindia.org

सहयोग राशी – रु. २०/–

Freedom of mind is the real freedom. A person whose mind is not free though he may not be in chains, is a slave, not a free man. One whose mind is not free, though he may not be in prison, is a prisoner and not a free man. One whose mind is not free though alive, is no better than dead. Freedom of mind is the proof of one's existence.

Constitutional morality is not a natural sentiment. It has to be cultivated. We must realise that our people have yet to learn it. Democracy in India is only a top dressing on an Indian soil which is essentially undemocratic.

Majorities are of two sorts: (1) communal majority and (2) political major ity. A political majority is changeable in its class composition. A political majority grows. A communal majority is born. The admission to a political majority is open. The door to a communal majority is closed. The politics of political majority are free to all to make and unmake. The politics of communal majority are made by its own members born in it.

There is no nation of Indians in the real sense of the world, it is yet to be created. In believing we are a nation, we are cherishing a great delusion. How can people divided into thousand of castes be a nation? The sooner we realise that we are not yet a nation, in a social and psychological sense of the world, the better for us.

My definition of democracy is - A form and a method of Government whereby revolutionary changes in the social life are brought about without bloodshed. That is the real test. It is perhaps the severest test. But when you are judging the quality of the material you must put it to the severest test.

Democracy is not merely a form of Government. It is primarily a mode of associated living, of conjoint communicated experience. It is essentially an attitude of respect and reverence towards our fellow men.

“In India, ‘Bhakti’ or what may be called the path of devotion or hero-worship plays a part in politics unequalled in magnitude by the part it plays in the politics of any other of the world. ‘Bhakti’ in religion may be a road to salvation of the soul. But in politics, ‘Bhakti’ or hero-worship is a sure road to degradation and to eventual dictatorship.”

“Equality may be a fiction but nonetheless one must accept it as a govern ing principle.”

“We are Indians, firstly and lastly.”

आयुष्य हे दिर्घायुष्यी असण्यापेक्षा महान असावे.

समता सैनिक दलाचा सैनिक म्हणजे समाज सेवेसाठी तळहातावर शिर घेवुन लढण्यासाठी सज्ज झालेला निर्भय योध्दाच म्हटला पाहिजे.

स्वयंसेवकांच्या संघटनेच्या (SSD) आवश्यकतेवर माझा पूर्णत: विश्वास आहे. ही संघटना चालु ठेवावी एवढेच नव्हे तर प्रत्येक प्रांतात तिच्या शाखा उघडाव्या व दलित वर्गातील प्रत्येक तरुण तिचा सभासद होईपर्यंत तिचा विस्तार करण्यात आला पाहिजे

माझ्या नंतर समाजातील काही वर्ग माझ्याशी बेईमानी करेल पण, काही सुशिक्षित तरुणांना माझी चळवळ समजेल, त्यांची कुवत असुनही अशिक्षित समाजास दिशा दाखवुन समाज प्रबोधन केले नाही तर, त्यांचे शिक्षण व्यर्थ असेल आणि असा तरुण जर माझ्या समाजात असेल तर, माझ्या सारखा दुर्दैवी कुणीच नसेल.

A Leader test lies in his ability to make the best of bad material..

राजकारणाच्या दोऱ्या विद्योशिवाय आपल्या हाती येणार नाही.

तुमच्या मताची किंमत मिठ-मिरची इतकी समजु नका, त्यातील सामर्थ्य ज्या दिवशी तुम्हाला कळेल तेव्हा ते मत विकत घेवु पाहणाऱ्यांइतके कंगाल कोणीच नसेल.

राजकारणात शिक्षण पाहिजे पण शिक्षणांपैकी शीलाची जास्त जरुरी आहे.



Educate, Agitate & Organise

**शिकवा, चेतवा आणि संघटित करा.**

**(डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दि. २० जुलै १९२४ ला स्थापित केलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभा या संस्थेस सुचविलेले ब्रीदवाक्य)**




**(SCF या राजकिय पक्षाला बरखास्त करण्यापूर्वी SSD चा ध्वज)**

# समता सैनिक दल

www.ssdindia.org




**(SCF या राजकिय पक्षाला बरखास्त करुन नवा राजकीय पक्ष RPI च्या स्थापनेनंतर SSD चा अभिप्रेत ध्वज)**

घटना कितीही चांगली असली पण ती राबविणारे जर अयोग्य माणसे असतील तर निश्चितच ती कुचकामी ठरते. तथापि घटना कितीही वाईट असली पण ती राबविणारे जर योग्य माणसे असतील तर ती अतिशय चांगली ठरते

जर मला संविधानाचा गैरवापर होतांना आढळला तर ते जाळणारा मी प्रथम व्यक्ती असेन.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

"माझा '**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियां** हा एक **नवा राजकिय पक्ष** काढण्याचा विचार आहे. **भारतीय राज्यघटना खऱ्याखुऱ्या अर्थाने राबविण्यासाठी**हा पक्ष काढण्यात येणार असुन पक्षाचे मुख्य ध्येय समानता, स्वातंत्र्य व बंधुभाव असे राहणार आहे."

शिस्त, संघटना आणि स्वार्थत्याग हाच बाणा ठेवा.

"संघटनेची ताकत ही केवळ सभासदांच्या संख्येवर अवलंबुन नसून सभासदांच्या प्रामाणिकपणावर, संघटनेशी एकनिष्ठतेवर आणि शिस्तपालनावर अवलंबून असते."

"प्रयत्न यशस्वी होवोत अथवा अयशस्वी होवोत, कार्याची प्रशंसा होवो अथवा न होवो, कर्तव्य हे केलेच पाहिजे.
जेव्हा मनुष्याची योग्यता व हेतुचा प्रमाणिकपणा सिध्द होतो तेव्हा त्याचे शत्रु देखील त्याचा सम्मान करु लागतात."

"परिवर्तनाच्या चळवळीत काम करायला भिणारी माणसे जिवंतपणी मेलेली असतात, तर चळवळीत काम करणारी माणसे मेल्यानंतर सुध्दा जिवंत राहतात."

"दुसऱ्या व्यक्तिच्या जिवावर समाज परिवर्तनाची स्वप्ने पाहु नका, कारण कोणी एकटा माणूस समाजात परिवर्तन करणार नाही समाज परिवर्तनाच्या कार्यात प्रत्येकाने सहभाग घेतला पाहिजे."

ज्यांना आपला इतिहास माहित नसतो ते कधीही आपला इतिहास घडवु शकत नाहीत.

दि. ३ ऑक्टोबर १९५७ ला दिक्षाभुमी येथे प्रचंड जनसमुदायापुढे घोषित करण्यात आलेल्या 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' या राजकीय पक्षाची त्यावेळेस तयार करण्यात आलेली घटना

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया

भाग १

## अंमलबजावणीची तारीख

कलम १

१. अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची घटना, असे या घटनेस संबोधले जाईल. यापुढील संदर्भात, अ. भा. रि. पक्ष या शब्दप्रयोगाबाबत, 'पक्ष' असा उल्लेख करण्यात येईल.

२. सदर घटना, भाग १२ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे १० मार्च १९५९ या तारखेपासून अंमलात येईल.

## ध्येय, उद्दिष्टे व अधिकार

कलम २

१.पक्षाचे ध्येय व उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

भारतीय संघ राज्याच्या घटनेस जोडलेल्या उद्देशपत्रिकेत (Preamble मध्ये),
असे म्हटले आहे की,
आम्ही भारतीय लोक,
सार्वभौम, लोकशाही, लोकसत्ताक भारताची प्रतिष्ठापना प्रतिज्ञेवर करीत आहोत; आणि सर्व भारतीय नागरिकांना :

| | |
|---|---|
| सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रामध्ये – | न्याय; |
| विचार, भाषण, निष्ठा, श्रद्धा व पूजेचे – | स्वातंत्र्य; |
| सामाजिक दर्जा व संधीच्या बाबतीत – | समानता; |
| व्यक्तिची प्रतिष्ठा व राष्ट्राचे ऐक्य आश्वासित करणारा – | बंधुभाव; |

प्राप्त करून देण्यासाठी, ..... याद्वारे हे संविधान अंगिकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

भारतीय संघ राज्याच्या घटनेतील उद्देशपत्रिकेत (Preamble मध्ये) जाहीर केलेले न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता प्राप्त करणे, हे पक्षाचे ध्येय व उद्दिष्टे आहेत.

---



२. पक्षाचे ध्येय व उद्दिष्टे वर दिल्याप्रमाणे असल्यामुळे सार्वजनिक कार्यात पक्षाचे वर्तन खालील तत्त्वप्रणालीवर आधारलेले राहील.

## तत्त्वप्रणाली

(१) सर्व भारतीय लोक कायद्यासमोर समान न्याय व दर्जाचे हक्कदार आहेत, असे पक्ष मानेल. एवढेच नव्हे तर प्रत्येक भारतीयास 'समान न्याय' हे त्याचे जीवनमूल्य प्राप्त करून घेण्याचा त्याचा हक्क आहे. म्हणून जेथे समता नाही तेथे ती आणण्यासाठी पक्ष झटेल व जेथे समता नाकारण्यात येते तेथे ती राबविण्यासाठी पक्ष लढा देईल.

(२) प्रत्येक भारतीय हा स्वत:च स्वत:चे साध्य असून त्याच्या व्यक्तिगत विकासाचा हक्क त्यास राहील व प्रत्येक नागरिकाचा त्याच्या स्वत:च्या मर्जीप्रमाणे विकास हेच अंतिम उद्दिष्ट मानले जाईल. प्रत्येक व्यक्तीचे सुख हा केंद्रबिंदू समजण्यात आल्यामुळे शासनसंस्था (State) हे व्यक्तिविकासासाठी केवळ साधन होय, असे पक्ष मानेल.

(३) प्रत्येक भारतीयाच्या धार्मिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याच्या हक्कांचा पक्ष पुरस्कार करील. मात्र हे साधत असताना इतर भारतीयांच्या हक्कांचे व शासनसंस्थेच्या आवश्यक तेवढ्या अधिकारांचे संरक्षण करण्याची आवश्यकता मान्य करण्यात येईल.

(४) प्रत्येक भारतीयास समान संधीचा हक्क राहील, असा पुरस्कार पक्ष करील; मात्र ज्यांनी यापूर्वी समान संधीचा लाभ उठविलेला आहे त्यांच्या आधी, ज्यांना अशी समान संधि नाकारण्यात आली होती, त्यांना प्राधान्य दिले पाहिजे, असा पुरस्कार पक्ष हिरिरीने करील.

(५) प्रत्येक भारतीयास त्याच्या जीवनातील दास्यता, भूख व भय यापासून मुक्ती मिळवून देणे हे राज्याचे कर्तव्य आहे, याची जाणीव शासनसंस्थेला पक्ष सातत्याने करून देत राहील.

(६) स्वातंत्र्य, समता व बंधुभाव राखला जावा यासाठी पक्ष आग्रह धरीत असताना मनुष्याची मनुष्यांकडून, वर्गसमूहाची वर्गसमूहांकडून आणि राष्ट्राची राष्ट्रांकडून होणाऱ्या पिळवणूक व दडपशाहीपासून मुक्ति मिळविण्यासाठी पक्ष सतत तोंड देत राहील.

(७) संसदीय लोकशाहीच्याच मार्गाने पक्ष जाईल. कारण इतर कोणत्याही राज्यपद्धतीपेक्षा संसदीय लोकशाही व्यक्ती आणि समाज या दोहोंच्या कल्याणाच्या दृष्टिने सर्वोत्तम राज्यपद्धती आहे.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर घालून दिलेल्या तत्त्वांच्या अनुरोधाने, पक्ष इतर बाबींसोबतच खालील गोष्टी मुख्यत्वे करील.

(१) भारतातील दडपलेली जनता आणि विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, बौद्ध (अल्पसंख्यांक) यांना संघटित करणे;

(२) शेतकरी, भूमिहिन शेतमजूर, कारखान्यातील कामगार व रोज-मजूर यांना संघटित करणे;
(३) शिक्षणसंस्था चालविणे, कला व धंदे-शिक्षण यासारखी शैक्षणिक कार्ये करणे;

४. पक्षाचे खालीलप्रमाणे अधिकार राहतील.

(१) पक्षासाठी मालमत्ता विकत, भाड्याने अथवा अन्यरित्या घेणे आणि पक्षाचा पैसा वेळोवेळी ठरेल त्याप्रमाणे गुंतविणे.

(२) पक्षासाठी मकान, इमारती अथवा अन्य बांधकाम बांधणे, त्यांची देखरेख करणे, पुनर्रचना करणे, दुरूस्ती करणे, पुनर्स्थापना करणे.

(३) पक्षाच्या सर्व अथवा काही मालमत्तेची विक्री, व्यवस्था, विकास, विनिमय करणे तसेच मालमत्ता भाड्याने देणे, गहाण ठेवणे अथवा अन्य तऱ्हेने हस्तांतरीत करणे.

(४) पक्षाचे ध्येय, धोरण व उद्दीष्टांची पूर्तता करण्यासाठी, तारणाने (जामिनीवर) अगर बिगर तारणाने पैसा उभारणे.

(५) पक्षाच्या वर नमूद केलेल्या हेतू व उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी अन्य कायदेशीर बाबी करणे.

भाग २

## स्थानिक संघटना

कलम ३

१. पक्षाच्या स्थानिक संघटनेत पुढील कमिट्यांचा समावेश राहील :

(अ) ग्राम कमिटी (ब) तालुका (तहसील) कमिटी
(क) जिल्हा कमिटी (ड) राज्य कमिटी

स्पष्टीकरण - दोन लाख लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांतील कमिट्यांना 'जिल्हा कमिटी' आणि पंचेवीस लाख लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरातील कमिट्यांना 'प्रदेश कमिटी'चा दर्जा राहील.

कलम ४

## सभासदत्व

पक्षाच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाने, इतर कोणत्याही राजकीय अथवा सामाजिक संघटनेच्या हेतू व उद्दिष्टांना मान्यता न दिलेल्या कोणत्याही इतर संघटनेचा सभासद नसलेल्या; व पक्षाची प्रस्तुत घटना मान्य असून २५ पैसे वार्षिक वर्गणी देणाऱ्या, १८ वर्षे वयावरील कोणत्याही इसमाला रिपब्लिकन पक्षाचे सभासद होता येईल आणि पक्षाच्या नियमांनुसार कोणत्याही उपकमिटीच्या निवडणुकीत मतदान करता येईल.



कलम ५

१. प्रत्येक तालुका कमिटी प्राथमिक सभासदांचे नोंदणी रजिस्टर तयार करील.

२. जो कोणताही सदस्य पक्षांतर्गत अन्य नियमानुसार अथवा सक्षम पदाधिकाऱ्याच्या आदेशानुसार अपात्र नसल्यास, अशा प्रत्येक सभासदाला मतदानाचा व पक्षांतर्गत पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीसाठी उभे राहण्याचा अधिकार राहील.

३. प्रत्येक प्राथमिक सभासदाला पक्षाच्या कोणत्याही पोट कमिटीचा, जरी तो सभासद नसेल, तरी पोट कमिटीच्या निवडणुकीसाठी उभे राहण्याचा अधिकार राहील.

कलम ६

१.पक्षाची प्राथमिक घटक शाखा ही गाव शाखा राहील.

२. त्या गावातील सभासदांनी निवडून दिलेल्या ५ ते ९ निर्वाचित सभासदांची ग्राम कमिटी राहील व ती कमिटी आपले पदाधिकारी निवडेल.

३. तालुक्यातील सर्व ग्राम कमिट्यांच्या अध्यक्षांची मिळून 'तालुका कमिटी' राहील.

४. तालुका कमिटीने निवडून दिलेल्या ९ ते १३ निर्वाचित सभासदांचे मिळून 'तालुका कार्यकारी मंडळ' होईल.

५. तालुका कार्यकारी मंडळ आपले पदाधिकारी निवडेल.

६. जिल्ह्यातील प्रत्येक तालुका कमिट्यांचे अध्यक्ष व कार्यवाह मिळून एक जिल्हा कार्यकारी मंडळ होईल.

७. जिल्हा कार्यकारी मंडळ आपले पदाधिकारी निवडेल.

८. राज्यातील जिल्हा कमिट्यांचे अध्यक्ष व कार्यवाह मिळून 'राज्य कार्यकारी मंडळ' होईल.

९. राज्य कार्यकारी मंडळ आपले पदाधिकारी निवडेल.

१०. समावेश : (Co-option) : प्रत्येक ग्राम कमिटी, तालुका कमिटी, जिल्हा कमिटी व प्रदेश कमिटी जास्तीत जास्त इतर चार सदस्यांचा आपल्या कमिटीत कोऑप्ट सभासद म्हणून समावेश करू शकेल.

भाग ३

## मध्यवर्ती (केंद्रीय) संघटना

कलम ७

१. रिपब्लिकन पक्षाच्या मध्यवर्ती संघटनेत पक्षाचे

१) अध्यक्ष २) सरचिटणीस
३) कोषाध्यक्ष (खजिनदार) ४) जनरल कौन्सिल
५) केंद्रीय कार्यकारी मंडळ ६) पक्षाचे अधिवेशन, अगर खास अधिवेशन

यांचा समावेश होतो.

कलम ८

१. प्रदेश कार्यकारी मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांची मिळून 'जनरल कौन्सिल' राहील.
२. सर्व प्रदेश कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षांचे मिळून 'केंद्रीय कार्यकारी मंडळ' होईल.
३. केंद्रीय कार्यकारी मंडळ आपल्यातून अध्यक्ष, सरचिटणीस व कोषाध्यक्षाची निवड करील. केंद्रीय कार्यकारी मंडळ जास्तीत जास्त पाच विभागीय कार्यवाहांची नेमणूक करू शकेल.
४. दर दोन वर्षांनी रिपब्लिकन पक्षाचे अधिवेशन भरेल.
५. अध्यक्ष स्वतः किंवा एक तृतियांश राज्य कमिट्यांच्या लेखी मागणीवरून पक्षाचे खास अधिवेशन बोलावू शकेल.
६. जनरल कौन्सिलची बैठक, केंद्रीय कार्यकारी मंडळास वाटेल तेव्हा अथवा जनरल कौन्सिलच्या ५० सभासदांनी केंद्रीय कार्यकारी मंडळास मागणी केल्यास, भरेल. मात्र अशा बैठकीची मागणी का बोलविण्यात यावी यासंबंधी स्पष्ट उल्लेख करावयास पाहिजे. अशी जनरल कौन्सिलची बैठक अर्ज मिळाल्यापासून दोन महिन्याच्या आत बोलाविण्यात येईल. अशा बैठकीत केंद्रीय कार्यकारी मंडळ, ठरविलेल्या विषयाव्यतिरिक्त इतर विषयसुद्धा विचारात घेऊ शकेल.
७. गणसंख्याः जनरल कौन्सिलच्या सभेचे कामकाज चालू करण्यास २५ सभासदांची उपस्थिती 'गणसंख्या' म्हणून गृहित धरण्यात येईल.
८. समावेश : (Co-option) : केंद्रीय कार्यकारी मंडळात पाच पेक्षा जास्त इतर कोऑप्ट सभासदांचा समावेश करता येणार नाही.

कलम ९

१. जनरल कौन्सिल अथवा केंद्रीय कार्यकारी मंडळ ठरवेल तेथे ठरलेल्या वेळी पक्षाचे सर्वसाधारण अधिवेशन भरेल.
२. सर्वसाधारण अधिवेशनात खालील पदाधिकारी व संस्थांचा समावेश राहील–
   १) अध्यक्ष,
   २) माजी अध्यक्ष,
   ३) जनरल कौन्सिलचे सभासद,
   ४) पक्षाच्या मध्यवर्ती कमिटीचे सभासद आणि
   ५) गाव, तालुका, जिल्हा, राज्य कमिटीच्या कार्यकारी मंडळाचे सभासद.
३. (१) सर्वसाधारण अधिवेशनात विषय नियामक समितीने मंजुरीसाठी शिफारस केलेल्या ठरावांवर प्रथम विचारविनिमय केला जाईल.
   (२) नंतर अधिवेशनापूर्वी कमीतकमी ४० प्रतिनिधींनी १५ दिवसांची नोटिस दिलेल्या



आणि वरील परिच्छेद (१) मध्ये नसलेल्या महत्वपूर्ण ठरावांचा विचार करण्यात येईल. परंतु अशा ठरावांची विषय नियामक कमिटीत चर्चा होऊन उपस्थित असलेल्या कमीतकमी एक तृतियांश सभासदांनी त्याचे समर्थन करावयास पाहिजे.
४. ज्या राज्यकमिटीच्या हद्दीत पक्षाचे अधिवेशन जाईल त्याची योग्य ती व्यवस्था ती राज्यकमिटी करील. त्यासाठी एका स्वागत समितीची नेमणूक स्वतःच्या मार्गदर्शनाखाली ती करेल. सदर समितीत राज्य कमिटीच्या सभासदांव्यतिरिक्त इतरांचाही समावेश केला जावू शकेल.
५ स्वागत समिती आपल्या सभासदांमधून, स्वागताध्यक्ष आणि इतर पदाधिकाऱ्यांची निवड करेल.
६. प्रदेश कार्यकारी मंडळाने नियुक्त केलेले हिशेबतपासणीस स्वागत समितीने केलेल्या जमाखर्चाचा हिशेब तपासतील. राज्य कार्यकारी मंडळ तपासलेल्या जमाखर्चाचा आढावा व अहवाल अधिवेशन संपल्यानंतर ६ महिन्यांच्या आत केंद्रीय कार्यकारी मंडळास सादर करील व शिल्लक राहिलेल्या बाकी रकमेचे केंद्रीय कार्यकारी मंडळ व राज्य कार्यकारी मंडळ यात समान वाटप करील.

कलम १०

१. अधिवेशनाच्या कमीतकमी एक दिवसापूर्वी जनरल कौन्सिलची बैठक पक्षाध्यक्षाचे अध्यक्षतेखाली 'विषय नियामक कमिटी' म्हणून होईल. केंद्रीय कार्यकारी मंडळ अधिवेशनाचे कामकाजाबद्दल व संमत करून घ्यावयाचे ठरावांबद्दल विषय नियामक कमिटीसमोर माहिती सादर करील. संमत करून घ्यावयाच्या ठरावांचा विचार करताना, केंद्रीय कार्यकारी मंडळ, राज्य कार्यकारी मंडळाने शिफारस केलेल्या ठरावांचा तसेच जनरल कौन्सिलच्या सदस्यांनी नोटिस देऊन सूचित केलेल्या ठरावांचा विचार करील.
२. विषय नियामक समिती ही कार्यक्रमावर चर्चा करील आणि खुल्या अधिवेशनात मांडण्यासाठी ठराव करील. राज्यकमिट्या किंवा अखिल भारतीय कमिट्या किंवा अखिल भारतीय कमिटीचे सभासद यांनी पूर्वसूचना दिलेल्या ठरावांच्या चर्चेस साधारणपणे शक्यतो चार तासाचा वेळ दिला जाईल.

कलम ११

१. केंद्रीय कार्यकारी मंडळाने ठरविल्यास अथवा बहुसंख्य राज्य कार्यकारी मंडळांनी ठरावान्वये विनंती केल्यास पक्षाचे अध्यक्ष पक्षाचे खास अधिवेशन बोलावतील.
२. वरील खास अधिवेशनाची सर्व व्यवस्था या अधिवेशनासाठी निवडलेली राज्य कमिटी पार पाडील.

कलम १२.

१.केंद्रीय कार्यकारी मंडळ, जनरल कौन्सिलच्या सभासदांपैकी एकाची अध्यक्षाच्या निवडणुकीकरीता 'निर्वाचन अधिकारी' म्हणून नियुक्ती करेल, परंतु अध्यक्षपदासाठी उमेदवार असलेल्या कोणत्याही सदस्यास निर्वाचन अधिकाऱ्याच्या नियुक्तीसाठी अपात्र समजण्यात येईल.

२. पक्षाचे अध्यक्षपदाकरीता, केंद्रीय कार्यकारी मंडळाचा कोणताही सभासद कोणत्याही सभासदाची सूचना करू शकतो. अशा सूचनेस दुसऱ्या सभासदाने अनुमोदन दिलेच पाहिजे.

३. निर्वाचन अधिकारी, अध्यक्षपदासाठी सूचित करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे प्रसिद्ध करील. प्रसिद्धीच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत, सूचित करण्यात आलेल्या उमेदवाराला, निर्वाचन अधिकाऱ्यास लेखी कळवून आपली उमेदवारी परत घेता येईल.

४. ज्यांनी आपली उमेदवारी मागे घेतली असेल त्यांची नावे वगळून निवडणूक अधिकारी बाकी उमेदवारांची नावे प्रसिद्ध करून ती राज्य कार्यकारी कमिटीकडे पाठवील. उमेदवारी मागे घेतल्यानंतर जर एकच नाव शिल्लक राहिल्यास अशा उमेदवाराची पक्षाचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे घोषित करण्यात येईल.

५. अध्यक्षीय उमेदवारांच्या नावांची अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यापासून कमीतकमी पंधरा दिवसांनंतर पक्षाची मध्यवर्ती कार्यकारिणी निवडणुकीची तारीख जाहीर करेल. मतदानाचा हक्क असलेला प्रत्येक सभासद अध्यक्षाच्या निवडीकरीता खाली नमूद केलेल्या पद्धतीप्रमाणे मतदान करील.

अ) मतदार आपले मत ज्या पत्रिकेवर उमेदवारांची नावे दर्शविली आहेत त्या पत्रिकेवरच नोंदवील.

ब) प्रत्येक मतदाराला एकच मत देण्याचा अधिकार राहील.

क) अध्यक्षाच्या निवडीस साधे (निर्भेळ) बहुमत पुरेसे होईल.

ड) अध्यक्षाच्या निवडणुकीनंतर व त्याच्या कार्यकाळात अध्यक्ष, अधिवेशनात अध्यक्षपद ग्रहण करील. जेव्हा केंद्रीय कार्यकारी मंडळाची बैठक राहणार नाही तेव्हा त्याचे सर्व अधिकार अध्यक्ष वापरील.

भाग ४

## पदाधिकाऱ्यांची कर्तव्ये, कामे व अधिकार

कलम १३

१. मध्यवर्ती कार्यकारीणी ही पक्षाची सर्वोच्च व सर्वाधिकारी संस्था अशी मानली जाईल. ती पक्ष आणि पक्षाची अखिल भारतीय कमिटी (जनरल कौन्सिल) च्या धोरणाची व



कार्यक्रमाची अंमलबजावणी करील आणि जनरल कौन्सिलला जबाबदार राहील. तद्वतच पक्षाच्या घटनेचा अर्थ आणि अंमलबजावणीचे बाबतीत ती निर्णायक अधिकारी म्हणून मानली जाईल.

२. मध्यवर्ती कार्यकारिणी पक्षाच्या अखिल भारतीय कमिटीच्या प्रत्येक बैठकीत मागील बैठकीच्या कामकाजाचा अहवाल आणि चालू बैठकीत चर्चिल्या जाणाऱ्या विषयांची कार्यक्रम पत्रिका सादर करील. त्याचप्रमाणे तत्संबंधी केलेल्या नियमानुसार अखिल भारतीय कमिटीच्या सभासदांनी पूर्वसूचित केलेले नॉन ऑफिशियल ठरावांना किती वेळ द्यावयाचा तेही ठरवील.

३. पक्षाच्या सर्व कमिट्यांची आणि सर्व दुसऱ्या सहकारी संस्थांची कागदपत्रे आणि हिशेबाची पुस्तके तपासण्याकरीता मध्यवर्ती कार्यकारिणी एक किंवा अधिक हिशेब तपासणीस किंवा निरीक्षक किंवा पहाणी करणारे अन्य अधिकारी नेमील. या तपासणी अधिकाऱ्यांना जरूर ती सर्व माहिती देणे, ऑफिसात प्रवेश देणे, कागदपत्रे व हिशेब दाखविणे या बाबी सर्व कमिट्यांवर आणि संस्थांवर बंधनकारक राहतील.

४.पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारिणीस खालील अधिकार राहतील.

(१) संघटनेच्या व्यवस्थित कामकाजाकरीता नियमावली तयार करणे.

(२) पक्षाच्या घटनेशी आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांशी विसंगत नसलेल्या व अन्यप्रकारे माहित नसलेल्या सूचना देणे.

(३) स्थानिक कमिट्या, इतर कनिष्ठ आणि स्वागत समिती यांच्या कामकाजावर देखरेख करणे, मार्गदर्शन करणे आणि नियत्रंण ठेवणे.

(४) केंद्रीय अध्यक्षाच्या व्यतिरिक्त इतर कमिट्यांच्या अध्यक्षांबद्दल आवश्यक ती शिस्तभंगाची कारवाई करणे.

(५) कोठल्याही खास परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी मध्यवर्ती कमिटीस पक्षाच्या हिताच्या दृष्टिने योग्य तो निर्णय घेण्याचा अधिकार राहील तथापि घटनाबाह्य अधिकारापलिकडे कारवाई केल्यास ती कारवाई पक्षाच्या अखिल भारतीय कमिटीकडे मान्यतेकरीता शक्य तितक्या लवकर सादर करण्यात येईल.

(६) पक्षशिस्तीचे पालन करण्यासाठी आणि सभासदांना मताधिकार देण्यासाठी अथवा नाकारण्यासाठी नियम तयार करणे.

५. घटनेच्या कोणत्याच कलमाचा भंग न होता खास अडचणीच्या प्रसंगी घटनेच्या तरतुदीचा अंमल सैल करण्याचा अधिकार पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारिणीस राहील.

६. मध्यवर्ती कार्यकारिणी पक्षाच्या अखिल भारतीय कमिटीचे हिशेब अखिल भारतीय कमिटीने नेमलेल्या एक किंवा अधिक हिशेबतपासणीसांकडून दरवर्षी तपासून घेईल आणि हे हिशेबाचे

दस्तावेज मध्यवर्ती कार्यकारिणीकडे राहील.

७. राज्य कार्यकारी मंडळ, राज्य मंडळाच्या योग्य कामकाजाकरीता, संविधानातील नियमांशी विसंगत नसलेले अथवा केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या नियमांशी विसंगत नसलेले, नियम तयार करू शकेल.

### भाग ५

### कलम १४

१. पक्षाच्या अध्यक्षाच्या सर्वसाधारण नियंत्रणास अनुसरून पक्षाचे जनरल सेक्रेटरी हे पक्षाच्या अखिल भारतीय कमिटीच्या ऑफीसचे प्रमुख राहतील.

२. जनरल सेक्रेटरी सामुदायिकरीत्या अखिल भारतीय अधिवेशनाच्या कामकाजाचा अहवाल व हिशेबतपासणीसाकडून तपासलेले ताळेबंद हिशेब अधिवेशन संपताच शक्य तितक्या लवकर प्रसिद्ध करण्यास जबाबदार राहील.

३. पक्षाच्या जनरल कौन्सिलच्या व केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या कामकाजाचा अहवाल आणि मागील संमत जमाखर्चानंतर पुढील जमाखर्चाचा आढावा सरचिटणीस तयार करील आणि पक्षाच्या अधिवेशनापूर्वी होणाऱ्या जनरल कौन्सिलच्या अंतीम सभेत सादर करील.

### कलम १५

१. मध्यवर्ती संघटनेच्या वतीने पक्षाच्या नावाने मिळणारा सर्व पैसा बँकेच्या खात्यामध्ये पक्षाच्या नावाने जमा केला जाईल. सदर पैशासंबंधीचा बँकेतील व्यवहार खालीलपैकी कोणत्याही दोन पदाधिकाऱ्यांच्या सहीने केला जाईल.

१) अध्यक्ष, २) जनरल सेक्रेटरी किंवा ३) खजिनदार.

### कलम १६

१. केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या देखरेखीत आणि नियंत्रणाखाली, राज्य कार्यकारी मंडळ आपल्या अधिकार क्षेत्रात पक्षकार्याबद्दल प्रमुख समजले जाईल.

२. राज्यातील स्थानिक संघटनांनी केलेल्या कार्याचा वार्षिक अहवाल आणि तपासलेल्या जमाखर्चाचा आढावा प्रदेशाध्यक्ष केंद्रीय कार्यकारी मंडळास सादर करील.

३. प्रदेश कार्यकारी मंडळ घटनेनुसार अथवा केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या मार्गदर्शनानुसार कार्य करण्यास अयशस्वी ठरल्यास केंद्रीय कार्यकारी मंडळ, अशा प्रदेश कार्यकारी मंडळास बडतर्फ करील आणि पक्षकार्यासाठी कामचलाऊ कमिटी तयार करील.

४. ग्राम आणि तालुका कमिट्यांच्या अध्यक्षांवर वार्षिक जमाखर्चाचा आढावा जिल्हा कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षाकडे पाठविण्याची जबाबदारी राहील.



५. जिल्हा कार्यकारी मंडळांचे अध्यक्ष वार्षिक जमाखर्चाचा आढावा राज्य अध्यक्षाकडे पाठवील.

### कलम १७

१. राज्य कार्यकारी मंडळाने प्राथमिक सभासद नोंदणी करून जमा केलेल्या रक्कमेचे समप्रमाणात वाटप होईल. म्हणजे ग्राम कमिटी, तालुका कमिटी, जिल्हा कमिटी, राज्य कमिटी व केंद्रीय कमिटी यांना प्रत्येकी ५ पैसे ह्याप्रमाणे वाटप होईल.(प्रत्येकी २०% )

२. मध्यवर्ती कार्यकारिणीचा प्रत्येक सभासद तसेच जनरल कौन्सिलचा प्रत्येक सभासद १० रूपये वार्षिक वर्गणी पक्षास देईल. ही अट निवडून आलेला (Elected) सभासद, पदसिद्ध (Ex-officio) सभासद, सहकारी सभासद (असोसिएट) अगर नियुक्त सभासद (नामिनेटेड) अशा सर्वानाच लागू राहील.

३. ग्राम, तालुका व जिल्हा कमिटीचा प्रत्येक सभासद दरवर्षी २ रूपये आणि राज्य कमिटीचा प्रत्येक सभासद दर वर्षी ५ रूपये वर्गणी आपआपल्या कमिटीस देईल.

४. कोणत्याही शाखेच्या सभासदाने आपली वार्षिक वर्गणी भरली नसेल तर त्याला त्या शाखेच्या कामकाजात भाग घेता येणार नाही.

### भाग ६

### कलम १८

१. या घटनेने अस्तित्वात आलेल्या कोणत्याही शाखेच्या, मंडळाच्या अगर लवाद मंडळाच्या सभासदाची जागा राजीनामा, मृत्यु अगर या घटनेच्या कलम २५ प्रमाणे काढून टाकल्यामुळे खाली होईल.

२. वर नंबर १ मध्ये नमूद केलेल्या कारणामुळे रिकाम्या होणाऱ्या जागा भरण्यासंबंधी दुसरी विशिष्ठ तरतूद केली नसल्यास, त्यांची निवड पूर्वी ज्या पद्धतीने सदर जागा भरल्या असतील, त्याच पद्धतीने केली जाईल.

३. कोणत्याही विशिष्ठ तरतुदी अभावी एखादी शाखा, मंडळ अगर लवाद मंडळ घटनेप्रमाणे अस्तित्वात आल्यानंतर; केवळ त्यातील एखादी जागा रिकामी झाल्यामुळे त्यांचे अस्तित्व बेकायदेशीर ठरणार नाही.

४. प्रत्येक कमिटीचा, कार्यकारी मंडळाचा आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाल चार वर्षांचा राहील.

भाग ७

कलम १९

१. प्रत्येक राज्याकरीता एक निवडणूक न्यायदान मंडळ (इलेक्शन ट्रायब्युनल) राहील.

२. पक्षाची राज्य शाखा आपल्या पहिल्याच सर्वसाधारण बैठकीत हजर सभासदांच्या ३/४ इतक्या बहुमताने कमीत कमी ३ व जास्तीत जास्त ५ सभासदांचे आपल्या राज्यासाठी निवडणूक न्यायदान मंडळ (इलेक्शन ट्रायब्युनल) नेमील.

३. प्रत्येक राज्यातील निवडणूक न्यायदान मंडळाचा कार्यकाल चार वर्षांचा राहील. परंतु ते नवीन निवडणूक न्यायदान मंडळाची निवड होईपर्यंत काम करील.

४. निवडणूक न्यायदान मंडळातील कोणत्याही सभासदास तो सदर मंडळाचा सभासद असेपर्यंत पक्षात पदाधिकाऱ्याची जागा स्वीकारता येणार नाही. अगर कोणत्याही निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही.

५. निवडणूक न्यायदान मंडळाच्या कामकाजासंबंधी नियम करण्याचा अधिकार पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारिणीला राहील. निवडणूक न्यायदान मंडळास देखील आपल्या कामकाजासंबंधी नियम करण्याचा अधिकार राहील. मात्र हे मध्यवर्ती कार्यकारिणीने याबाबत केलेल्या नियमांशी विसंगत नसावेत.

कलम २०

१. कोणत्याही उमेदवारास त्याच्या निर्वाचन क्षेत्रातील निवडणुकीसंबंधी तक्रार करण्याचा अधिकार राहील. ही तक्रार याबाबत केलेल्या नियमांना धरून असली पाहिजे. अशी तक्रार निवडणुकीबाबतचा निर्णय लागलेल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत राज्य निवडणूक लवाद मंडळाकडे करावी. तक्रार आल्यानंतर ताबडतोब निवडणूक लवाद मंडळ आपला निर्णय शक्य तितक्या लवकर संबंधीत घटकांना कळवील.

२. निवडणूक लवाद मंडळ जोपर्यंत कोणतीही निवडणूक रद्द ठरवीत नाही तोपर्यंत निवडून आलेला इसम कायदेशीररित्या निवडून आला असे मानण्यात येईल.

३. कोणत्याही इसमाने कोणत्याही निवडणुकीत गैरवर्तन केल्याचे, सभासदांचे नोंदणी रजिस्टर अथवा यादी योग्यरित्या ठेवण्यात कुचराई केल्याचे, हेतू पुरस्सर खोटी तक्रार, खोटा आक्षेप दाखल केल्याचे आढळून आल्यास, राज्य निवडणूक लवाद मंडळ स्वत: किंवा राज्य कार्यकारी मंडळ अथवा संबंधीत घटकाने सुचविल्यानुसार अशा इसमास निवडणुकीत उभे राहण्यास अपात्र ठरवील अथवा ठराविक कालखंडापर्यंत पक्षाबाहेर काढील.

४. एखादी निवडणूक बनावटपूर्वक पार पडल्याची तक्रार राज्य कार्यकारी मंडळाकडे आल्यास ते अशा तक्रारीची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करील.



कलम २१

१. राज्य कार्यकारी मंडळ राज्य निर्वाचन अधिकाऱ्याची निवड करील.

२. राज्य निर्वाचन अधिकाऱ्याचा कार्यकाल चार वर्षांचा राहील.

३. 'राज्य निर्वाचन अधिकारी' राज्यातील सर्व घटक शाखांच्या निवडणुका पार पाडील. तो राज्य शाखा व जिल्हा शाखा याचेशी सल्लामसलत करून जिल्ह्यासाठी जिल्हा निर्वाचन अधिकारी नियुक्त करील. तसेच तालुका निर्वाचन अधिकारी व गाव निर्वाचन अधिकारी यांचीही नेमणूक करील. त्याचप्रमाणे राज्यातील निवडणुका योग्य रीतीने पार पाडण्यासाठी त्याला युक्त वाटेल अशा अधिकाऱ्यांची नेमणूक करील. याशिवाय राज्य निर्वाचन अधिकारी त्याजवर मध्यवर्ती कार्यकारिणीने वेळोवेळी सोपविलेली कामेही पार पाडील.

भाग ८

## उमेदवारांची निवड

कलम २२

१. केंद्रीय व राज्य कायदेमंडळांच्या निवडणुकीत पक्ष उमेदवारांची निवड करण्यासाठी व त्याकरिता आवश्यक ते नियम तयार करण्यासाठी, केंद्रीय कार्यकारी मंडळ पक्षाचे अध्यक्ष व इतर चार सभासदांचे एक बोर्ड तयार करील व पक्षाचा अध्यक्ष त्या बोर्डाचा अध्यक्ष राहील.

२. इलेक्शन बोर्ड वेगवेगळ्या स्थानिक कमिट्यांना उमेदवार सुचविण्याची संधी देईल. निवडणूक मंडळ प्रत्येक उमेदवाराला असलेला पाठिंबा विचारात घेऊन उमेदवारांची क्रमवार यादी तयार करील.

३. उमेदवार निवडताना उमेदवारास मिळालेला पाठिंबा जरूर विचारात घेतला जाईल, परंतु अशा उमेदवारास निवडलेच पाहिजे हे बंधन इलेक्शन बोर्डावर राहणार नाही.

४. स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडणुकीने अथवा निवडून पाठवावयाच्या उमेदवारांची निवड व त्याकरीता आवश्यक नियम करण्यासाठी राज्य कार्यकारी मंडळ इलेक्शन बोर्डाची निर्मिती करेल.

५. राज्य इलेक्शन बोर्ड देखील लोकसभा व राज्यविधी मंडळे यासाठी उमेदवारांच्या शिफारशी मध्यवर्ती इलेक्शन बोर्डास करतील.

भाग ९

## संकीर्ण बाबी

कलम २३

१. पक्षाचा ध्वज मध्यभागी पांढऱ्या रंगाचे अशोक चक्र असलेल्या ३ : २ या लांबी रूंदीच्या प्रमाणातील निळ्या चौकोनी कपड्याचा राहील.

२. प्रस्तुत घटनेतील कोणतीही कमिटी आपले अधिकार एखाद्या लहान कमिटीस अगर एखाद्या व्यक्तीस सुपूर्द करील.

भाग १०

## घटनेत दुरूस्ती

कलम २४

१. प्रस्तुत घटनेत संशोधन, दुरूस्ती किंवा बदल केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या दोन तृतियांश बहुमताने करता येईल.

भाग ११

## शिस्तीचे नियम

कलम २५

१. पक्षाच्या कोणत्याही सभासदाकडून खाली नमूद केलेल्यापैकी कृत्य घडल्यास तो शिस्तभंग समजल्या जाईल.

(१) पक्षाच्या जाहीर धोरणाविरूद्ध वर्तन करणे.

(२) पक्षाच्या धोरणावर उघडपणे व जाहीरपणे टीका करणे.

(३) पक्षाच्या कोणत्याही सभासदाविरूद्ध उघडपणे व जाहीरपणे टीका करणे.

(४) घटनात्मक मार्गाने निवडलेल्या पुढाऱ्याचा अधिकार धुडकावून लावण्यासाठी एखाद्यास साथ देता यावी म्हणून पक्षांतर्गत गटबाजी करणे.

(५) एखाद्या सभासदाबद्दल गैरसमज पसरविणे अगर जाणूनबुजून अपप्रचार करणे.

(६) पक्षाच्या कामकाजात अळथळे आणणे.

(७) पक्षाच्या फंडाचा अपहार करणे.

(८) पक्षाच्या मान्यतेशिवाय एखाद्या पक्षाशी अगर गटाशी सहकार्य करणे.

(९) पक्षाच्या अधिकारपदाचा व सत्तेचा दुरूपयोग करणे अगर अजिबात वापर न करणे व त्यामुळे पक्ष निष्क्रिय करण्यास कारणीभूत होणे.

(१०) पक्षाचे ध्येय, धोरण व अधिकार यांच्या कक्षेच्या बाहेरचे कृत्य करणे.



(११) पक्षाने कोणत्याही निवडणुकीत उभ्या केलेल्या अधिकृत उमेदवारास निवडणुकीत विरोध करणे.

२. शिस्तभंगाला जबाबदार असणाऱ्या सभासदाला शिक्षा करण्याचा अधिकार राज्य शाखेच्या अध्यक्षाला राहील. राज्य शाखेच्या अध्यक्षाच्या निर्णयाविरूद्ध मध्यवर्ती शाखेकडे न्याय मागण्याचा अशा सभासदाला अधिकार राहील. याबाबत मध्यवर्ती कार्यकारिणीचा निर्णय अंतिम व शेवटचा मानला जाईल.

शिस्तभंगाच्या कृत्याबद्दल खालीलप्रमाणे शिक्षा करता येतील ---

(१) पक्षामधून कायमचे बडतर्फ करणे.

(२) पक्षामधून काही काळ बडतर्फ करणे.

(३) पदाधिकारी पदावरून काढून टाकणे.

(४) पदाधिकाऱ्याच्या जागेवर निवडण्यास अपात्र ठरविणे.

भाग १२

## हंगामी तरतुदी

कलम २६

१. प्रस्तूत घटनेची अंमलबजावणी करताना निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या उद्देशाने अध्यक्षाला योग्य वाटेल अशा, परंतु १५ पेक्षा जास्त नसलेल्या, सभासदांचे एक केंद्रीय कार्यकारी मंडळ नियुक्त करता येईल. अध्यक्ष व ही मध्यवर्ती कार्यकारिणी मिळून ही घटना कोणत्या विभागात व कोणत्या वेळी अंमलात आणावयाची ते मुदतीमध्ये ठरवतील. घटना पूर्णत: लागू करण्याच्या क्रियेला गती देण्यासाठी संक्रमणकाळात घटनेतील तरतुदींची योग्यरितीने अंमलबजावणी होण्याच्या दृष्टिने काही बंधने सैल करण्याचा अथवा स्थगित करण्याचा, परिस्थितीनुसार मर्यादित काळापर्यंत अधिकच्या तरतुदी करण्याचा अथवा त्यात तात्पुरता बदल करण्याचा अधिकार अध्यक्ष व हंगामी कार्यकारी मंडळास राहील.

---

# समता सैनिक दल

## घटना

कलम -१ नाव आणि संघटना :

(अ) संघटनेचे नाव 'समता सैनिक दल' राहील. ज्याला यापुढे 'एस.एस.डी.' (S.S.D.) म्हणून संबोधले जाईल.

(ब) समता सैनिक दल हे भारतीय अनुसूचित जाती संघाशी (ऑल इंडिया शेडुल्ड कास्ट फेडरेशन-एस.सी.एफ.) जोडले जाईल. प्रत्येक प्रांतातील आणि शहरातील समता सैनिक दलाच्या कार्याची देखरेख करण्यासाठी एस.सी.एफ.चा अध्यक्ष कार्यकारणीच्या सल्ल्याने एस.सी.एफ.च्या एका नामनिर्देशित व्यक्तिची पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करील आणि अशाप्रकारे नियुक्त व्यक्तिच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक प्रांत व शहर येथील समता सैनिक दल कार्य करील.

कलम -२ ध्येय आणि उद्देश :

(अ) वंश, धर्म, जात, लिंग आणि वर्ग इत्यादीवर आधारलेली विषमता नष्ट करण्यास आणि सर्वांसाठी स्वतंत्रता आणि समानता या मूल्यांवर आधारलेल्या समाजाची निर्मिती करण्याकरीता अनुसूचित जातीच्या सर्व घटकांना संघर्षासाठी एकत्र आणण्यास झटणे हे समता सैनिक दलाचे ध्येय आहे.

(ब) वरील ध्येय पूर्तिस्तव---

१) समता सैनिक दल अनुसूचित जातीच्या युवकांना आपल्या ध्वजाखाली एकत्रित आणेल व संघटित करील.

२) त्यांच्या मनात स्वाभिमान, स्वावलंबन आणि स्वबलिदानाची भावना विकसित करण्याकरीता सामाजिक, सांस्कृतिक व इतर कार्यक्रम अनुसूचित जातीच्या लोकांमध्ये विशेषतः युवकांमध्ये घडवून आणण्यास समता सैनिक दल प्रोत्साहन देईल.

३) समता सैनिक दल त्याचे ध्येय व उद्देशास पोषक कार्य करणाऱ्या संघटना आणि चळवळीस सहकार्य देईल.

कलम -३ सभासदत्व :

ज्यांना वरील ध्येय व उद्दिष्टे मान्य आहेत अशा १८ वर्षांवरील अनुसूचित जातीची कोणतीही व्यक्ति वार्षिक वर्गणी १२ आणे भरून समता सैनिक दलाचा सभासद होऊ शकतो.



कलम -४ प्रशिक्षण :

१. समता सैनिक दलाचे प्रशिक्षण शारीरिक, बौद्धिक आणि लष्करी अशा तीन प्रकारचे राहील.

२. प्रशिक्षण शिबिरे, समविचारी लोकांची चर्चा सत्रे, खास कार्यक्रमानिमित्ताने काही व्यक्तींच्या सभा, वर्ग, भाषणे, वादविवाद, परिसंवाद, वाचनालये वगैरे आणि वेळोवेळी योग्य वाटणाऱ्या अशा इतर कार्यक्रमांचे समता सैनिक दल आयोजन करील.

३. अखिल भारतीय समता सैनिक दलाच्या शाखा सर्व प्रांतामध्ये कार्य करतील आणि जेथे जेथे शक्य आहे त्या त्या भारतीय संस्थानामध्ये शाखा उघडल्या जातील. प्रत्येक प्रांतिक शाखा आपल्या जिल्हा समित्यांचे संघटन करेल. तसेच प्रत्येक जिल्हा शाखा शहर आणि ग्राम समित्यांचे संघटन करेल.

४. शहर किंवा ग्राम येथील समता सैनिक दलाची आमसभा (एकूण सभासद) आपल्या दर्जानुसार पांच सभासद, एक अध्यक्ष आणि दोन सचिव असलेल्या शहर अथवा ग्राम समितीची निवड करील आणि खालीलप्रमाणे त्यांच्यामधून जिल्हा आमसभेकरीता प्रतिनिधींची निवड करेल.

-१ ते २५ सभासदांकरीता एक प्रतिनिधी.

-२५ ते ५० सभासदांकरीता दोन प्रतिनिधी आणि असेच पुढेही...

५. जिल्हा आमसभा आपल्यामधून जिल्हा समितीसाठी १ अध्यक्ष, २ सचिव आणि १० सभासदांची निवड करेल. तसेच आपल्या दर्जानुसार प्रांतिक परिषदेकरीता खालीलप्रमाणे प्रतिनिधींची निवड करेल.

-जिल्हा आमसभेच्या पाच प्रतिनिधीकरीता प्रांतिक समितीसाठी १ प्रतिनिधी.

-जर जिल्हा समितीच्या प्रतिनिधींची संख्या पाचच्या वर आणि दहाच्या आत असल्यास दोन प्रतिनिधी राहतील आणि ह्याचप्रमाणे पुढेही...

६. प्रांतिक आमसभा आपल्या दर्जानुसार २० सभासद, १ अध्यक्ष आणि २ सचिव असलेल्या प्रादेशिक समितीची निवड करील आणि अखिल भारतीय समितीसाठी प्रतिनिधींची देखील निवड करील. अखिल भारतीय समितीसाठी निवडलेल्या सभासदांची संख्या प्रत्येक प्रांतिक समितीच्या एकूण सभासद संख्येच्या ५ टक्क्यापेक्षा जास्त असणार नाही.

७. समता सैनिक दलाच्या अखिल भारतीय समितीच्या कार्यकारिणीकरीता १ अध्यक्ष, १ उपाध्यक्ष, १ महासचिव, २ सहसचिव आणि अखिल भारतीय केंद्र समितीने प्रत्येक प्रांतातून एक याप्रमाणे निवडलेले सभासद असलेली एक अखिल भारतीय कार्यकारिणी निवडेल.

८. अखिल भारतीय समता सैनिक दलास संलग्न असलेली प्रत्येक प्रांतिक समिती वार्षिक २५ रू. संलग्नता शुल्क आणि आपल्या एकूण वार्षिक उत्पन्नाचा शेकडा ५ टक्के भाग अखिल भारतीय समता सैनिक दलास देतील.

९. अखिल भारतीय समता सैनिक दलाची परिषद वर्षातून एकदा तरी भरलीच पाहिजे.

कलम –५ रचना :

१. १२ सैनिकांची एक तुकडी बनेल. एका तुकडीमधून दोन सैनिकांची 'प्रथम नायक' आणि 'दुय्यम नायक' म्हणून निवड करण्यात येईल.
२. २४ सैनिकांचे (दोन तुकड्यांचे) एक प्लाटून बनेल. तुकडी नायंकानी निवडून दिलेल्या नायकास 'प्लाटून नायक' असे संबोधले जाईल.
३. ९६ सैनिकांची (चार प्लाटूनची) एक कंपनी बनेल. प्लाटून नायकांनी निवडलेल्या कंपनी प्रमुखास 'कंपनी कमांडर' असे संबोधले जाईल.
४. ३८४ सैनिकांची (४ कंपन्यांची) एक बटालियन बनेल. कंपनी अधिकाऱ्यांनी निवडलेल्या बटालियन प्रमुखास 'लेफ्टनंट' असे संबोधले जाईल.
५. ११५२ सैनिकांची (तीन बटालियनची) एक रेजीमेंट बनेल. बटालियन प्रमुखांनी निवडलेल्या प्रमुखास 'सेनापती' (जनरल ऑफिसर कमांडिंग) असे संबोधले जाईल.
६. सर्व जिल्हा आणि प्रांतातून अशाप्रकारे निवडलेले २५०० सेनापती (जी ओ सी) मिळून एक डिव्हिजन बनेल. त्यांच्यातून निवडलेल्या नायकाला ऑल इंडिया कमांडर–इन–चीफ असे संबोधले जाईल.

कलम –६ दलाच्या सभा :

१. समता सैनिक दलाची सभा दर ६ महिन्यातून कमीत कमी एकदा तरी होईल. सभेचे कामकाज आणि नियमावली घटनेला सुसंगत अशाच पद्धतीने वेळोवेळी करण्यात येतील.
२. अध्यक्ष सहामाही सभेची तारीख ठरवेल. तसेच त्यांना योग्य वाटेल तेव्हा किंवा १/३ सभासदांनी लेखी विनंती अर्ज केल्यास २० दिवसांच्या आत खास सभा बोलावेल.
३. खास सभेची नोटीस १० दिवसांपूर्वी आणि सहामाही सभेची नोटीस १५ दिवसांपूर्वी सर्व सभासदांना देण्यात यावी. ह्या बाबतीत दिनांक, वेळ, स्थळ, आणि विषयक्रम याचा स्पष्ट उल्लेख असावा.
४. सभेचे कामकाज चालण्यास सुरवातीपासून शेवटपर्यंत १/३ सभासदांची गणसंख्या निश्चितपणे असावी. जर सभेत १/३ सभासदांपेक्षा कमी सभासद उपस्थित असल्यास सभेचा अध्यक्ष त्यांना उचित वाटेल अशा वेळेपर्यंत किंवा निश्चित अशा दिवसांपर्यंत सभा स्थगित करेल. अशा स्थगित झालेल्या सभेतील विषय हे पुढच्या सभेसमोर प्रथम निकालात काढण्यात येतील आणि अशावेळी गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
५. प्रत्येक सभेचा अध्यक्ष हा दलाचा अध्यक्षच राहील. त्याच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष सभेचा अध्यक्ष राहील आणि जर दोघेही गैरहजर असल्यास उपस्थित सभासदांमधून एका सभासदाची तात्पुरती निवड सभाध्यक्ष म्हणून करण्यात येईल.
६. सभेचे निर्णय उपस्थित सभासदांच्या बहुमताने मंजूर करण्यात येतील. जर एखाद्या ठरावावर समान मते पडल्यास सभाध्यक्षाचे मत निर्णायक मानण्यात येईल.



कलम –७ दैनिक वेळापत्रक :

सोमवार– नीती तत्त्वे (Moral)
मंगळवार– खेळ व शारीरिक कवायत (Games & Physical Drill)
बुधवार– लष्करी कवायत (Military Drill)
गुरूवार– खेळ व शारीरिक कवायत
शुक्रवार– प्रथमोपचार (First Aid)
शनिवार– लष्करी कवायत
रविवार– राजकीय व सामाजिक चर्चा (Political & Social)

कलम –८ शिस्त :

जर एखादा सैनिक किंवा दलाचा अधिकारी धुम्रपान व मद्यपान करताना किंवा वरिष्ठांची अवज्ञा करताना किंवा दुसरी एखादी खोडी करताना आढळल्यास त्याला ताकीद (Warning) देण्यात येईल. जर ह्यानंतरही त्याच्या वागणुकीत सुधारणा न झाल्यास त्याचा गणवेश व पद काढून टाकण्यात येवून त्याला दलातून काढून टाकण्यात येईल.

कलम –९ गणवेष :

खाली दिलेल्या गणवेष संबंधीच्या नियमांचे पालन सैनिक व अधिकारी वर्ग ह्यांच्याकडून झालेच पाहिजे.

सैनिक–खाकी हॉफ पँट, खाकी हॉफ शर्ट, घडीची टोपी, कॅनव्हासचा ब्राऊन जोडा किंवा पठ्ठाणी सँडल आणि मोजे व साडेचार फूटाची काठी.

निम् अधिकारी– खाकी हॉफ पँट, खाकी हॉफ शर्ट, ब्राऊन जोडे, खाकी उनी मोजे, खाकी हॅट, छडी (केन), शिटी आणि गळ्याचे खाकी कापड.

अधिकारी– वरील प्रमाणेच सर्व शिवाय बुश कोट.

कलम –१० दलाचा निधी :

१.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया नेमलेला पर्यवेक्षक (सुपरवाईझर) आणि दलाचा सेनापती यांच्या अनुमतीने दलाचा सर्व निधी एका बँकेत किंवा अनेक बँकातून समता सैनिक दलाच्या नांवाने ठेवण्यात येईल. ह्या निधी संबंधीचे सर्व व्यवहार सेनापती व दलाचा मुख्य सचिव यांच्या नांवाने चालतील.

२. दलाच्या सर्व शाखा आपापल्या प्रदेश किंवा जिल्ह्यामध्ये कोणतीही एक बँक वा अनेक बँकात संपूर्ण निधी दलाच्या नावाने जमा करतील. अशा प्रकारे जमा केलेल्या निधीच्या जमा खर्चाचे व्यवहार दलाच्या आमसभेने ह्या कामाकरीता अधिकृतपणे नेमलेल्या तीन व्यक्तींच्या नावाने चालेल.

कलम –११ ध्वज :

अखिल भारतीय समता सैनिक दलाचा ध्वज चार फूट लांब व अडीच फूट रूंद राहील. ध्वजाचा संपूर्ण भाग गडद निळ्या रंगाचा राहील आणि वरच्या बाजूला डाव्या कोपऱ्यात पांढऱ्या रंगामध्ये नोकदार ११ तारे राहतील. ध्वजाच्या मध्य भागात पांढऱ्या रंगामध्ये सूर्य राहील. त्यामध्ये मोठ्या आकाराने निळ्या रंगात SCF ही अक्षरे लिहिलेली राहतील. ध्वजाच्या खालच्या बाजूला उजव्या कोपऱ्यामध्ये पांढऱ्या रंगात S.S.D. ही अक्षरे राहतील.▪ स्वतंत्रता, समानता आणि बंधुता तसेच ध्येय प्राप्तीसाठी लढा ही या ध्वजाची ओळख आहे.▪

• सैनिकाची प्रतिज्ञा •

• मी, समता सैनिक दलात प्रवेश घेणारा अनुसूचित जातीचा घटक, माझ्या जमातीला जुलूम, शोषण, पिळवणूक व गुलामगिरी ह्यापासून मुक्त करण्याच्या उदात्त कार्यासाठी सन्मानिय, शूर, शिस्तबद्ध आणि निर्धारी लढवय्या होण्याची प्रतिज्ञापूर्वक शपथ घेतो •

• माझ्या जमातीच्या लोकांच्या न्याय व मानवी हक्काच्या रक्षणासाठी पुढे धावून जाण्यास समता सैनिक दलाच्या आज्ञा पालनार्थ
मी सदैव तयार राहीन •

• कमकुवतपणा, भित्रेपणा किंवा वाईट उद्देश यामुळे जर माझ्या हातून ह्या प्रतिज्ञेचा भंग झाल्यास आणि माझ्या लोकांच्या हितसंबंधात मी फसवणूक केल्यास, विश्वासघात केल्यास, दलाकडून दिली जाणारी शिक्षा भोगण्यास पूर्णपणे पात्र ठरेल • (संदर्भ : डॉ. बा.आं.लेखन व भाषणे : खंड १७, भाग ३, पृष्ठ ५६६.)

---

**RPI च्या स्थापने नंतर SSD च्या घटनेत अभिप्रेत असलेल्या महत्वाच्या सुधारणा :**

कलम १. (ब) समता सैनिक दल हे <u>रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया</u> (Successor of SCF) सोबत जोडले जाईल. प्रत्येक प्रांतातील आणि शहरातील समता सैनिक दलाच्या कार्याची देखरेख करण्यासाठी <u>आर.पी.आय.</u> चा अध्यक्ष कार्यकारणीच्या सल्ल्याने <u>आर.पी.आय.</u> च्या एका नामनिर्देशित व्यक्तिची पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करील आणि अशाप्रकारे नियुक्त व्यक्तिच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक प्रांत व शहर येथील समता सैनिक दल कार्य करील.

कलम ११. ध्वज : अखिल भारतीय समता सैनिक दलाचा ध्वज चार फूट लांब व अडीच फूट रूंद राहील. ध्वजाचा संपूर्ण भाग गडद निळ्या रंगाचा राहील आणि वरच्या बाजूला डाव्या कोपऱ्यात पांढऱ्या रंगामध्ये नोकदार ११ तारे राहतील. ध्वजाच्या मध्य भागात पांढऱ्या रंगामध्ये सूर्य राहील. त्यामध्ये मोठ्या आकाराने निळ्या रंगात **<u>RPI</u>** ( SCF बरखास्त केल्यामुळे)ही अक्षरे लिहिलेली राहतील. ध्वजाच्या खालच्या बाजूला उजव्या कोपऱ्यामध्ये पांढऱ्या रंगात S.S.D. ही अक्षरे राहतील. स्वतंत्रता, समानता आणि बंधुता तसेच ध्येय प्राप्तीसाठी लढा ही या ध्वजाची ओळख आहे.

• सैनिकाची प्रतिज्ञा •

• मी, समता सैनिक दलात प्रवेश करणारा <u>समाजाचा घटक</u>, माझ्या समाजाला जुलूम, शोषण, पिळवणूक व गुलामगिरी ह्यापासून मुक्त करण्याच्या उदात्त कार्यासाठी सन्मानीय, शूर, शिस्तबद्ध आणि निर्धारी लढवय्या होण्याची प्रतिज्ञापूर्वक शपथ घेतो •

• माझ्या समाजातील लोकांच्या न्याय व मानवी हक्काच्या रक्षणासाठी पुढे धावून जाण्यास समता सैनिक दलाच्या आज्ञा पालनार्थ मी सदैव तयार राहीन •

**समता सैनिक दल**




**१९५६ पुर्वीचा झेंडा**




**१९५६ नंतरचा अभिप्रेत झेंडा**

• कमकुवतपणा, भित्रेपणा किंवा वाईट उद्देश यामुळे जर माझ्या हातून ह्या प्रतिज्ञेचा भंग झाल्यास आणि माझ्या लोकांच्या हितसंबंधात मी फसवणूक केल्यास, विश्वासघात केल्यास, दलाकडून दिली जाणारी शिक्षा भोगण्यास पूर्णपणे पात्र ठरेल •

उपरोक्त घटना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२७ ला जन्मास घातलेल्या समता सैनिक दलाची असुन ती मराठीत स्वैर भाषांतरीत केलेली आहे.

अनुवादाचा प्रश्न उदभवल्यास ती मूलत: इंग्रजीत DBAWS Vol. 17, Part 3, Page 566 मध्ये वाचावी आणि तिच ग्राह्य धरावी. १९५६ च्या बुध्दधम्म धम्मदिक्षे नंतर आणि SCF ला बरखास्त करुन बाबासाहेबांनी RPI ला जन्मास घातल्यामुळे सदर बदल घटनेत अभिप्रेत आहेत.



# दी बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया

## घटना

दि बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया चे पंजीकरण डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, मुंबई चे कार्यालयात ४ मे १९५५ ला केले. सदर संस्थेचा रजिस्टर्ड नं. ३२२७/५५-५६ हा आहे. सोसायटीची घटना पुढील प्रमाणे आहे.

## नियम

सोसाटीची घटना शासीत करणारे नियम व कायदे :

१) सोसायटीचे नाव बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया हे असेल.

२) सोसायटीचे पंजीकृत कार्यालय बॉम्बे (मुंबई) येथे असेल.

३) सोसायटी ची उद्दीष्टे ही असतील.

१) भारतात बौध्द धम्माच्या प्रसारास चालना देणे.
२) बौध्द धम्म उपासनेसाठी मंदीरे (विहारे) स्थापन करणे.
३) धार्मिक व वैज्ञानिक विषयांकरिता शाळा व महाविद्यालये स्थापन करणे.
४) अनाथालय, दवाखाने व मदत केंद्रे (आधारगृहे) स्थापन करणे.
५) बौध्द धर्माच्या प्रसाराकरिता कार्यकर्ते तयार करण्यासाठी बौध्द प्रशिक्षण केंद्र (सेमीनरीज) स्थापन करणे.
६) सर्व धर्माच्या तुलनात्मक अध्ययनास प्रोत्साहन देणे.
७) सर्वसामान्य लोकांना बौध्द धम्माचा खरा अर्थबोध करुन देण्यासाठी बौध्द साहित्य प्रकाशित करणे आणि हस्तपत्रके व छोट्या पुस्तिका काढून त्याचे वितरण करणे.
८) गरज भासल्यास भिख्खुंचा नवा संघ निर्माण करणे.
९) बौध्द धम्माच्या प्रचारार्थ प्रकाशनाचे कार्य सुरु ठेवण्यासाठी मुद्रणालय किंवा मुद्रणालये स्थापन करणे.
१०) भारतीय बौध्दांचे सामायीक कृतीसाठी आणि बंधुभाव स्थापन (संर्वधन) करण्यासाठी मेळावे आणि परिषदा भरविणे.

४) सोसायटीचे अधिकार हे असतील

१) सोसायटीसाठी देणग्या स्विकारणे व निधी गोळा करणे.
२) धम्मोपदेशकांचा सांभाळ करणे.
३) सोसायटीच्या उद्देशांकरिता संस्थेची मालमत्ता विकणे किंवा गहाण करणे.
४) मालमत्ता धारण करणे व ताब्यात ठेवणे.
५) सोसायटीकरिता मालमत्ता विकत घेणे, भाडेकराने घेणे किंवा अन्य प्रकारे मिळवणे आणि काळप्रसंगाच्या निश्चितीनुसार सोसायटीच्या पैशाची गुंतवणुक व व्यवहार करणे.

६) सोसायटीच्या उद्दीष्टांकरिता घरे, इमारती किंवा बांधकामाची रचना करणे. त्याची निगा राखणे, पुर्नरचना करणे, दुरुस्ती करणे, फेरफार करणे, बदलणे किंवा पुर्नस्थापित करणे.

७) सोसायटीची सर्व किंवा कोणतीही मालमत्ता विकणे, निकालात काढणे, सुधारणे, व्यवस्थित ठेवणे, विकसित करणे, विनिमय करणे, भाडेकरार करणे, गहाण ठेवणे, सुपूर्द करणे किंवा व्यवहाराचा करार करणे.

८) सोसायटीच्या ध्येय व उद्दीष्टांची पुढील वाटचालीतील सुरक्षितेचा दृष्टीकोन बाळगून सोसायटी, सोसायटी द्वारा चालवीत असलेल्या किंवा सोसायटीशी संबंधीत असलेल्या कोणत्याही संस्थे द्वारे अथवा सोसायटी द्वारा इतर कोणत्याही संस्था अथवा संस्थांशी सहकार्य करणे, संयुक्त करणे किंवा संलग्न करणे.

९) सोसायटीचे कोणतेही हेतू, ध्येय व उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठीजामीन ठेवुन (सुरक्षा ठेव) अथवा न ठेवता पैसा उभारणे.

१०) उपरनिर्दीष्ट कोणतेही ध्येय व उद्दीष्टे साध्य करण्यासाठी प्रसंगानुरुप किंवा त्यास पुरक अन्य कायदेशीर कृती व कार्य करणे.

५) संस्थेचे सभासदस्यत्व :

संस्थेचे सभासदांचे पुढीलप्रकारे दोन वर्ग असतील :

१) सभासद

२) सहयोगी सभासद

१) सभासदत्वासाठी अटी :

सभासद कोण होऊ शकतो :-

सोसायटीने निर्धारीत व नियमीत केलेल्या धम्मदिक्षा विधीचे अनुकरण करुन बौध्द धर्माचरणास सुरुवात करणारी व सोसायटीची पूर्ण वार्षिक वर्गणी शुल्क देणारी कोणतीही व्यक्ती सोसायटीचा सभासद होण्यास पात्र असेल.

२) सहयोगी सभासदत्व :

सहयोगी सभासद कोण होऊ शकतो :-

सोसायटीच्या ध्येय व उद्दीष्टांशी सहानुभूती ठेवणाऱ्या व बौध्द धर्माला विरोध न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला सोसायटीची वार्षिक वर्गणी शुल्क देऊन सहयोगी सभासद करता येऊ शकते.

३) सभासदत्वाच्या मर्यादा (बंधन)

तरतूदीप्रमाणे, अध्यक्ष कोणत्याही विशिष्ट बाबतीत ठरवू शकतो को, कोणताही सभासद, जरी त्याने धम्मदिक्षेच्या विधीचे अनुकरण केले असले तर, त्याला नेमून दिलेल्या काळापर्यंत शिकावू सभासद राहील.

४) शिकावू सभासद व सहयोगी सभासद सल्लागार समिती व जनसमितीचे सभासद होण्यास पात्र राहणार नाही व त्यांना मतदानाचा अधिकार नसेल.



६) स्पष्टीकरण :

निगम, संस्था आणि संघटनांना सोसायटीचे सभासद होण्यास अध्यक्ष परवानगी देऊ शकतात.

७) सभासदत्व शुल्क :

सोसायटीचे सभासद किंवा सहयोगी सभासद असणाऱ्या प्रत्येकाला कमीत कमी १ रु. वार्षिक सभासदत्व शुल्क देणे बंधनकारक आहे. वेळेच्या प्राप्त शुल्क न भरल्यास सभासद सभासदत्व व त्याचबरोबर मतदानाच्या अधिकार गमावेल. अध्यक्ष असा दंड जोपर्यंत माफ करित नाही तो पर्यंत सभासदाने मतदानाचा अधिकार गमावलेला असेल.

८) अध्यक्ष

१) सोसायटीला अध्यक्ष असेल, अध्यक्षांचा कार्यकाळ आजीवन असेल.

२) सोसायटीचे पहिले अध्यक्ष डॉ. भीमराव रामजी आंबेडकर एम.ए.पिएच.डी.डी.एस.सी., बॅरिस्टर ॲट लॉ असतील.

३) कोषाध्यक्ष व सचिव यांची नियुक्ती अध्यक्ष करतील. अध्यक्षांना, कोषाध्यक्ष व सचिव यांचा कार्यकाळ निर्धारित करण्याचा अधिकार असेल.

४) अध्यक्षांना हे अधिकार असतील -

१) सोसायटीचे हेतू पूर्ततेसाठी गरजेनुसार अशी कार्यालये निर्माण करणे.

२) त्यांना योग्य वाटत असलेल्या व्यक्तींची त्या कार्यालयात नियुक्ती करणे, आणि

३) सोसायटीचे प्रशासन चालविण्यासाठी त्या व्यक्तींना कर्तव्य व कार्ये नेमून देणे.

५) सोसायटीचे कार्य चालविण्यासाठी भारताच्या विविध भागात केंद्रे निर्माण करण्याचा व त्याठिकाणी कार्यकर्ते व पदाधिकारी नियुक्त करण्याचा अधिकार अध्यक्षांना असेल.

९) सचिव व कोषाध्यक्ष यांची कर्तव्ये :

१) सोसायटीच्या वतीने पत्रव्यवहार करणे सचिवांचे कर्तव्य असेल अनुरुपअसे कर्तव्य पार पाडणे.

२) सोसायटीचा हिशेब ठेवणे कोषाध्यक्षाचे कर्तव्य असेल.

१०) सोसायटीशी संबंधीत सर्व पैसा बँकेत जमा राहील. सोसायटीच्या हेतू कार्यासाठी अध्यक्ष पैसा काढू शकतील.

११) व्यवस्थापन

१. सोसायटीच्या कार्यव्यवहारांची व्यवस्था अध्यक्षांमार्फत होईल.

२. कार्यपालनाचे सर्व अधिकार अध्यक्षांमध्ये विहीत असतील.

३. अध्यक्षांना, त्यांच्या कर्तव्यपालनात मदत करण्यासाठी सल्लागार समिती असेल.

४. सल्लागार परिषदेत १० सदस्य असतील दर ५ व्या वर्षी सभासदांकडून त्यांची निवड केली जाईल.

५. पहिल्या सल्लागार समितीचे सदस्य अध्यक्षांकडून नामनिर्देशीत केले जातील.

६. अध्यक्षांना जेव्हा केव्हा गरज भासेल त्यावेळी सल्लागार समितीची बैठक होईल.

७. विषयपत्रिका अध्यक्ष तयार करतील.

८. अध्यक्षांची परवानगी असेल तर कोणताही सदस्य विषय पत्रिकेच्या बाहेरचा प्रश्न उपस्थित करु शकेल.

९. सल्लागार समितीचे ठराव फक्त शिफारशी स्वरुपाच्या असतील.

१२) जनपरिषद सामान्य प्रशासकीय मंडळ किंवा सर्वसामान्य परिषद

१) सोसायटीची एक जनपरिषद असेल. प्रत्येक सभासद जनपरिषदेचा सदस्य असेल. जनपरिषदेची बैठक दर दोन वर्षानी होईल वजनपरिषदेने केलेल्या कार्याचा आढावा अध्यक्ष सादर करतील. शिकावू सभासद नसणारा प्रत्येक सभासद जनपरिषदेच्या सामान्य (आम) सभेस उपस्थित राहू शकेल.

२) आर्थिक विश्वासघात अथवा गैरकृत्य यात अध्यक्ष न्यायालयाद्वारे दोषी आढळल्यास त्या आधारावर जनपरिषदेच्या बैठकीत उपस्थित असलेल्या ३/४ (तिन चर्तुतांश) सभासदाच्या बहुमताने अध्यक्षांना कार्यमुक्त (पदमुक्त) करण्याचा अधिकार जनपरिषदेला असेल.

१३) घटनेच्या दुरुस्त्या

१) पुढील अटींचे समाधान झाल्यास या घटनेत दुरुस्त्या करता येऊ शकतात.

अ) दुरुस्तीचा प्रस्ताव सल्लागार समितीच्या २/३ (दोन- तृतियांश) बहुमताने पारीत झाल्यास

ब) सुचविलेल्या दुरुस्तीच्या लेखाचे सभासदांना बैठकीच्या आयोजनाच्या सुचनेसह वितरण केले असल्यास.

क) सुचनेचा कालावधी तीन महिन्यापेक्षा कमी नसल्यास

२) बैठकीला हजर असलेल्या दोन तृतीयांश सदस्यांचा पाठींबा असल्याशिवाय कोणतीही दुरुस्ती स्विकारल्याचे समजले जाणार नाही.

सोसायटीच्या नियम व नियमावलची प्रमाणित सत्यप्रत

स्वाक्षऱ्या

१) बी.आर. आंबेडकर २) माधव जी. मालवणकर ३) सी.एस. पिल्लई

(टिप - दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया ही संस्था **भारतीय बौध्द महासभा** या नावानेही जनमानसात प्रचलीत आहे. मराठीतील ही घटना इंग्रजीतील मूळ घटनेचा स्वैर अनुवाद आहे. म्हणूनच घटनेसंबंधात किंवा तीच्या कोणत्याही भागाच्या अर्थासंबंधात वाद उपस्थित झाल्यास मूळ इंग्रजी घटना वाचावी व तीच ग्राह्य समजण्यात यावी.)

संदर्भ : डॉ. बा.आं.लेखन व भाषणे : खंड १७, भाग २, पृष्ठ ४५५, ९५६.

पुढची दुरूस्ती २१ ऑगस्ट १९५५, पहा : खंड १७, भाग १, पृष्ठ ४३५.

घटनेचा मजकूर जाने.१९५५ मध्ये तर तत्त्वे ३ ऑक्टोबर १९५१ मध्ये बाबासाहेबांनी लिहून प्रकाशित केले (पहा- खंड १७, भाग १, पृष्ठ ३८६). शीर्षक व इतर किरकोळ बदलासह प्रस्तुत घटना ३ ऑक्टोबर १९५७ ला घोषित केलेल्या रिपाइंची आहे.



**घटनात्मक लोकशाही प्राणप्रिय मानणाऱ्या बाबासाहेबांच्या पक्षाला..**

रिपब्लिकन पक्षाचे एकूण व दैनंदिन कामकाज हे घटनात्मक पायावर उभे केल्याशिवाय त्याला टिकाऊ स्वरुप प्राप्त होणे कठीण आहे. या गोष्टीची जाणीव ठेवून पक्षांतर्गत लोकशही ही पक्षाच्या घटनेतून राबविली जावी या भावनेतून पक्षांतर्गत वैचारिक मंथनाचे काम कित्येक दिवस चालू होते हे काम सहज सुलभ होण्याऐवजी त्यात अधिकच गुंतागुती व पेचप्रसंग निर्माण झाले. घटनात्मक पेचप्रसंगातून पक्षाची गाडी नीट रांगेला लावण्यासाठी आमच्या अनेक सहकार्यांनी जे अनेक प्रयत्न केलेत त्या घटनात्मक पेचप्रसंगाची हेटाळणी करुन तो तांत्रिक मुद्दा समजून त्यामुळे पक्षाचा सर्व पायाच पोकळ ठेवण्याची व सोयीने दडपून कारभार करुन घटनाच खुंटीला अडकविण्याचे जेव्हा दुष्टोत्पतीस आले तेव्हा घटनात्मक लोकशाही प्राणप्रिय मानणाऱ्या बोधिसत्व डॉ. बाबासाहेबांच्या पक्षाला 'घटनेशिवाय कारभार' ही गोष्ट बुध्दीला पटेनाशी वाटल्यामुळेच ... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेडूल्ड कॉस्ट फेडरेशनची जी छापील घटना इंग्रजीत प्रसृत केली होती तीच पायाभूत मानून त्यात अनुंषंगिक बदल करुन मूळ इंग्रजी घटना तयार केली. हा त्या मूळ इंग्रजी घटनेचा अनुवाद आहे.... ए.जी.पवार (मराठी घटना प्रकाशित करताना लिहलेल्या 'दोन शब्द' मधून... दि. ७ ऑगष्ट १९५९)

**मूल्यांधारित समाजरचना लोकजागृती करुन... घडवून आणणे... हाच निर्धार !**

भारतीय राज्य घटनेत नमूद केलेल्या उद्दिष्टांची पूर्ती करणे हेच भारतीय रिपब्लिकन पक्षाचे मुख्य ध्येय असल्याचे भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या घटनेत नमूद करण्यात आले आहे, सबब भारतीय राज्यघटनेतील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ह्यावर आधारित समाजरचना लोकजागृती करुन लोकशाहीच्या संवेदनशील मार्गाने घडवून आणणे आवश्यक असल्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या अनुयायांमध्ये तशी भावना दृढमूल्य व्हावयास पाहिजे. या दृष्टिकोनातून विचार करता रिपब्लिकन पक्षाच्या निरनिराळ्या शाखा, उपशाखांचा कारभार पक्षाच्या घटनेप्रमाणे चालविणे क्रमप्राप्त आहे.

....बॅरि राजाभाऊ खोबरागडे

रिपब्लिकन पक्ष हा पददलित व गेलेल्या गरिबांचा पक्ष आहे. या निर्धन जनतेच्या हक्कांसाठी लढणे आणि त्यांचा आर्थिक, समाजिक शैक्षणिक आणि राजकीय दर्जा वाढवून त्यांना इतरांबरोबर समान पातळीवर आणणे, ही कार्ये करण्यास आमचा पक्ष कटिबध्द आहे. हाच पक्षाचा निर्धार आहे.

....कर्मवीर दादासाहेब गायकवाड

राजकारण कोणास करावयाचे असेल तर राजकारणाचा चांगला अभ्यास केला पाहिजे. अभ्यासाशिवाय जगामध्ये कोणालाच काहीच साधता येणार नाही.

आपल्या समाजातील पुढाऱ्यांवर अत्यंत मोठी जबाबदारी आहे.

आपल्याला राजकीय सत्ता मिळाल्याशिवाय आपला सामाजिक व धर्मिक उद्धार होणे अशक्य आहे. आपला जो नाश झाला आहे, आपण आज हजारो वर्षे खितपत पडलो आहोत, त्याचे कारण आपणास राजकीय सत्ता नव्हती ही सत्ता आपण मिळविली पाहिजे. राजकीय सत्ता ही एक अजब शक्ती आहे.

आपल्या समाजात आपापसात फार मदभेद आहेत. आपापसातील मदभेद नाहीसे करा.... एक गुण फार महत्वाचा, तो म्हणजे बहुमताने ठरलेले सर्व मान्य करणे, ही कृति राजकारणात फार आवश्यक आहे. माझ्या मताप्रमाणे जर कारभार चालला तर मी संस्थेत राहीन अशा प्रवृती फार वाईट राजकारणात भांडणे होतात, ती विरुन जाण्याची सवय ठेवली पाहिजे.

....डॉ. बाबासाहेब आंबेडकर